कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान -एक ऐतिहासिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच,डी,) पदवीसाठी सादर करायचा संशोधन आराखडा

संशोधक

सोनकांबळे साहेब सटवाजी

मार्गदर्शक

डॉ.डी.डी.कोल्हेकर

संशोधन मागदर्शक व इतिहास विभाग प्रमुख

कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला ,वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय उमरी,तां.उमरी जि.नांदेड

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय,अर्जापुर ता.बिलोली

जानेवारी -२०२५

प्रस्तावना:

प्रत्येक व्यक्तीला जन्माला आल्यानंतर आपल्या मातृभूमीचे पांग फेडता आले पाहिजेत. आधुनिक महाराष्ट्रात जे शिक्षण महर्षी होऊन गेले त्यापैकी एक म्हणजे कर्मवीर बाबासाहेब देशमुख एखाद्या भागाचा सामाजिक व शैक्षणिक विकास होण्यासाठी एखादे व्यक्तिमत्व गरजेचे असते असेच व्यक्तिमत्व भविष्यातील आदर्श समाज घडवीत असतो. बाबासाहेब देशमुख यांनी सुरू केलेली शैक्षणिक चळवळीची मुहूर्तमेढ त्यांनी सगरोळी भागात रोवली. त्यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या माध्यमातून आपल्या कर्तृत्वाची ओळख महाराष्ट्रातील जनतेला करून दिली. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाबद्दल लिहीत असताना अनेक व्यक्तींचा या ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात स्वामी रामानंद तीर्थ,गोविंद पानसरे इत्यादी व्यक्तींनी या भागासाठी आपले आयुष्य खर्च केले त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन महाराष्ट्र कर्नाटक आंध्र प्रदेश तेलंगणा या भागाच्या सीमेवरील सगरोळीच्या रचनात्मक विकासासाठी समाजासमोर एक आदर्श प्रस्थापित करून या भागातील निरक्षरता व अज्ञान या गोष्टी दूर करण्यासाठी ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था उभारली. शिक्षणातून ज्ञानाचा प्रचार व प्रसार करून जनतेत राष्ट्रप्रेम देशभक्ती व उपजीविकेचे साधन निर्माण करून देण्यात या संस्थेचा महत्त्वाचा वाटा आहे. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पवित्र हस्ते १५ जून १९६० रोजी कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी संस्कृती संवर्धन मंडळाची स्थापना केली .या संस्थेच्या माध्यमातून श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व राजेश्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालय स्थापन केले. त्यानंतर तेवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यात स्वतःला चंदना प्रमाणे झिजवले. सन १९९६ मध्ये छत्रपती शिवाजी सैनिक विद्यालय निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व राष्ट्रप्रेम यांचे धडे देऊन एक जबाबदार नागरिक घडवण्यासाठी जे संस्कार लागतात ते पूर्ण संस्कार व शिक्षण त्यांनी सैनिक शाळेच्या माध्यमातून दिले. देशाला सर्वांगीन विकासासाठी समाजकारण,अर्थकारण व शिक्षण महत्वाचे असते.कर्मयोगी बाबासाहेबांनी शैक्षणिक कार्यासोबतच स्वतःला समाजकारणात झोकून दिले.

समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक सामाजिक कार्याचा भाग म्हणून मुलांसाठी व मुलीसाठी वस्तीगृह निर्मिती केली. मांजरा नदीच्या काठावर वसलेल्या या गावात सुंदर असा निसर्ग निर्माण करण्यात त्यांच्या महत्त्वाचा वाटा आहे. कृषी व पर्यावरण या घटकांना चालना देऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी मदत केली दुष्काळी परिस्थितीत गोरगरिबांना अन्नधान्य वाटप बी-बीयाने या गोष्टी मिळवून दिल्या अतिवृष्टीच्या प्रसंगांमध्ये ते धावून आले व त्यांनी गरिबांना सरकारी मदत मिळवून दिले.राजकारणातून समाजकारण असाच त्यांचा बाणा होता स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण झाल्यानंतर सगरोळी भागातील ग्रामपंचायतीचे ते पहिले सरपंच होणारे व्यक्ती आहेत. सरपंच झाल्यानंतर त्यांनी गावात पिण्याचे पाणी रस्ते घरकुल या मूलभूत सुविधा लोकांना मिळवून दिल्या. सगरोळी भागाचे नैसर्गिक विकास व सुशोभीकरण करण्यात बाबासाहेब देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली या भागात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून या भागाला प्रदूषण मुक्त सौंदर्य मिळवून दिले.

कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्यावर महात्मा ज्योतिराव फुले राजश्री शाहू महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, संत तुकडोजी महाराज संत गाडगे महाराज, महर्षी कर्वे, वसंतराव नाईक यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यांनी गरिबांच्या मुला मुलींचे लग्न लावून दिले अनाथ मुलांसाठी वस्तीगृह निर्माण केले. अपंग शाळा महिला बाल आश्रम सुरु केले. या संस्थेच्या माध्यमातून आजही मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य चालू आहे. २५ वर्षांपूर्वी पाणलोट क्षेत्र विकासाच्या माध्यमातून विकसित केलेल्या नागदरवाडी जिल्हा नांदेड येथील दुष्काळग्रस्त भागाची जलकथा म्हणजेच पाणी चित्रपट नागदरवाडी या गावात संस्कृती संवर्धन मंडळाने सहकार्य करून दुष्काळ निवारण केले.सगरोळी भागात उन्हाळ्यात पाण्याची टंचाई निर्माण असताना टँकरने पाणी पुरवठा केला असे अनेक कामे बाबासाहेब देशमुख यांनी केलेली आहेत. ते केवळ एक शैक्षणिक कार्यातील व्यक्ती नसून राजनैतिक व सामाजिक कार्य असलेले चौफेर व्यक्तिमत्व होते. त्यांनी शुन्यातून स्वतःच्या कर्तृत्वाने विश्व निर्माण केले.त्यांनी

केलेले हे कार्य ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे संशोधनासाठी कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान एक ऐतिहासिक अभ्यास या विषयाची निवड केली आहे.

विषय निवड :

ते मानवी सद्‌गुणाचे प्रतिक होते कर्मयोगी बाबासाहेब देशमुख केवळ व्यक्ती नसुन एका नव्या नितीमान सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीचे शिल्पकार होते. त्यांची थोरवी सर्वश्रुत आहे. त्याच्या आई वडिलांनी केलेले नैतिकतेचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर रूजलेले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात चरित्र आणि शिल यांचा संगम होता. त्यांच्याकडे व्यवस्थापन, दूरदृष्टी, प्रभावी धोरण होते. शिवाय समाजाला वाहून घेण्याची वृत्ती, भावी गोष्टीचा आराखडा तयार ठेवण्याचे नियोजन इत्यादी असंख्य गुण त्याच्या अंगी होते. ते सगरोळी गावचे प्रथम बिन विरोध संरपच होते. आपल्यागावात समाजकारण राजकारण याच बरोबर शिक्षणाची गंगा आणली. शिक्षणाच्या माध्यमातून गोरगरिब,बहुजन व ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे काम त्यांनी केले. हे कार्य ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे मी संशोधनामध्ये कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान-एक ऐतिहासिक अभ्यास या विषयाची निवड केली. या विषयावर कोणत्याही प्रकारची संशोधन कार्य झालेली नाही. हा विषय नव्याने आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१) सगरोळी परिसराचा व देशमुख घराण्याचा इतिहासाचा आढावा घेणे .

२) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या जीवनपटाची माहिती घेणे .

३) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या सामाजिक योगदानाचा आढावा घेणे.

४) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या सामाजिक शैक्षणिक कार्याची समाजावर झालेल्या परिणामाची माहिती घेणे .

५) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक योगदानाचा आढावा घेणे.

६) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक कार्याचा समाज जीवनावर झालेल्या परिणामाचा आढावा घेणे.

७) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी राजकीय क्षेत्रात केलेल्या कार्याचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करणे.

८) कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी विविध क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक दृष्टिकोनातून आढावा घेणे.

संसोधानाची व्याप्ती व मर्यादा:

संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी या संस्थेच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात सादर केला जाणार आहे कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीवर दृष्टिकोन टाकून त्यांची जडणघडण शैक्षणिक व सामाजिक कार्य अशा निरनिराळ्या क्षेत्रातील योगदान या बाबीचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे या भागातून सामाजिक कार्य पर्यावरण व प्रशिक्षक यांचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यात कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांची कार्य हे महत्वपूर्ण आहे. त्यांचा समग्र कार्याचा त्याच्या परिणामांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधन फक्त सगरोळी परिसर व कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान-एक ऐतिहासिक अभ्यास या विषयावर संशोधन करण्यात येणारआहे. नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील सगरोळी व परिसर या भागातील असून इतर शैक्षणिक संस्था व संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी या संस्थेची निगडित असून संशोधनासाठी इतर परिसराचा थोड्या प्रमाणात अभ्यास करण्यात येत आहे.कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर विशेषतः भर दिला जाणार आहे.

संशोधन पद्धती व तथ्य संकलन :

कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान -एक ऐतिहासिक अभ्यास या विषयावरील प्राथमिक व दुय्यम साधनाचा उपयोग केला जाणार आहे. बाबासाहेब देशमुख यांनी केलेल्या राजकीय, सामाजिक,व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याच्या संदर्भातील माहिती वृत्तपत्रे, लेख व त्यांची भाषणे, तसेच संस्था व महाविद्यालयाने काढलेल्या सुद्धा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगात घेता येतील आणि कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या यांच्या समकालीन व्यक्तीच्या मुलाखती घेऊन त्यामधून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे संशोधन पूर्ण केली जाणार आहे. त्यासाठी निरीक्षण,सर्वेक्षण,मुलाखत,प्रश्नावली इत्यादी संकलन पद्धतीचा उपयोग करून वर्णनात्मक व विश्लेष्टात्मक पद्धतीने तथ्याचे संकलन केले जाईल. यात कर्मयोगी

बाबासाहेब देशमुख यांची स्फूट लेखाच्या संग्रहाचा अभ्यास करणे तसेच सगरोळी परिसराला प्रत्यक्ष भेट यात तेथील शैक्षणिक संस्था म्हणजेच संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेअंतर्गत येणारी श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालय इत्यादी विषयी माहिती संकलित करणे कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्याशी संबंधित व्यक्तीच्या मुलाखती व प्रश्नावली पद्धतीच्या माध्यमातून तथ्य संकलन करणे व तेथील ऐतिहासिक दस्तावेज संस्थेची वेळोवेळी प्रकाशित होणारे विशेषांक व मासिके संस्थेचे अहवाल याशिवाय कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या समकालीन व्यक्तीच्या मुलाखती घेण्यात येऊन त्या मधून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे संशोधन पूर्ण केले जाणार आहे. त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे असल्यामुळे त्यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी पुढील प्रकरणात केली जाणार आहे.

प्रकरणाची वर्गवारी

प्रकरण पहिले

१.पार्श्वभूमी

प्रस्तुत पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधन विषयाचे महत्त्व, समस्या सूत्रण, संशोधनाची उद्दिष्टे ,गृहितके ,व्याप्ती व मर्यादा संशोधन पद्धती व तथ्य संकलन व पूर्व संशोधनाचा आढावा या संदर्भात सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. यासोबतच कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या पूर्व आयुष्याचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण दुसरे:

2.सामाजिक क्षेत्रातील योगदान:

सामाजिक क्षेत्रातील योगदान हे शोध प्रबंधनातून दुसरे प्रकरण असून प्रस्तुत प्रकरणात कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. राजकारणातून समाजकारण करत समाज प्रबोधन व वैज्ञानिक दृष्टिकोन लोकांनी स्वीकारणे गरजेचे आहे.असे त्यांचे मत होते. सामाजिक बांधिलकीतुन त्यांनी समाज उन्नतीसाठी भरपूर प्रयत्न केले.सगरोळी भागात अनाथ मुलांसाठी निर्माण केलेली वस्तीगृह हे त्यांच्या सामाजिक कार्याची पावती होय.बाबासाहेब

देशमुख यांनी सामूहिक प्रयत्नातून पर्यावरण पूरक असे अनेक उपक्रम या भागात कार्यान्वीत केले.अनेक मान्यवरांना बोलून त्यांच्या व्याख्यानातून समाजा समोर आदर्श ठेवून दिला. अशा विविध कार्यक्रमाच्या आयोजनामुळे सामाजिक परिवर्तन घडवून आले.

प्रकरण तिसरे :

३ .शैक्षणिक कार्य :

कर्मयोगी बाबासाहेब हे विद्येचे पुजारी होते.सगरोळी भागातील जन सामान्याच्या विकासासाठी शिक्षण हे माध्यम त्यांनी निवडले या भागाच्या विकासासाठी शिक्षणाची जोड देऊन १५ जुन १९६० मध्ये पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या हस्ते संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेची स्थापना केली.या संस्थेद्वारे त्यांनी माध्यमिक,उच्च माध्यमिक व सैनिकी शाळेची सुरुवात करून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व राष्ट्रप्रेम निर्माण केले. त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक कार्याचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहेत.

प्रकरण चौथे:

४. राजकीय कारकीर्द :

देशात स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण झाल्यानंतर सगरोळी या गावात निर्माण झालेल्या ग्रामपंचायतीचे ते पहिले सरपंच होते पुढे सलग २५ वर्ष ग्रामपंचायत ते सरपंच होते. त्यांनी गावाच्या विकासासाठी विविध योजना आणून गावाचा विकास केला गावकऱ्यांसाठी त्यांनी वेगवेगळी कौशल निर्माण करणारी प्रयोग करून दाखवणे राजकारणातून समाजकारण हाच त्यांचा हेतू होता त्यांच्या या कार्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे:

५. इतर लोकोपयोगी कार्य :

कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी सगरोळी भागाच्या विकासासाठी स्वतःला झोकून दिलं होतं आजच्या सगरोळी भागाच्या विकासाचा आराखडा त्यांच्या संकल्पनेतून निर्माण झाला आहे .शाळेच्या आजूबाजूचा परिसर व इतर रस्त्यांचा दुतर्फा वृक्षारोपण

करून या भागाला सुंदर केलं जल व्यवस्थापनात त्यांनी पुढाकार घेऊन सगरोळी मधील तलावाचे स्थलांतर केले.आज या भागाचा जो विकास झाला आहे. ते बाबासाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतूनच झाला आहे. अशा विविध कार्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणांमध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे:

६. उपसंहार:

उपसंहार हे शोध प्रबंधातील सहावे व शेवटचे प्रकरण आहे.या प्रकरणात संशोधन अभ्यासाचा सारांश,निष्कर्ष व कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या कार्याचा मूल्यमापन केले जाणार आहे.

संदर्भसूची:

१) कुठे, मु.के.व कुंटे विजया, नांदेड जिल्हा दर्शन,पुणे, मंदिर कोश प्रकाशन,१९९९.

२) गुरुनाथ देशमुख व भालचंद्र देशमुख यांचे कर्मयोगी बाबासाहेब देशमुख.

३) नांदेड जिल्हा गॅझेट -भाग १

४) नांदेड जिल्हा गॅझेट -भाग २

५) संस्कृती संवर्धन मंडळ शारदानगर सगरोळी नोव्हेंबर 2024 विद्या व्रत विशेष अंक युगाष्द ५११९ वर्ष ५७ वे अंक : पाचवा

६) कर्मयोगी बाबसाहेब देशमुख(सगरोळी)कार्यदर्शन विशेषांक,मार्च२०१२

७)कटारे अनिल व साखरे विजय-भारतीय कलेचा इतिहास,नांदेड, कल्पना प्रकाश,२००८

संशोधक — सोनकांबळे साहेब सटवाजी

मार्गदर्शक — प्रा.डी.डी.कोल्हेकर